दिनांक 16/04/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 07

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील अहिल्यादेवीनगर येथील रस्ता क्र.4 येथे हायमास्ट पोल उभा करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विदयुत अभियंता यांची दिनांक 17/04/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) अहिल्यादेवीनगर येथील नागरिक यांचा अर्ज दि. 16/04/2025

अहिल्यादेवीनगर येथे असेलल्या रस्ता क्र.4 येथे हायमास्ट पोल उभा करून देणेबाबत तेथील नागरिकांचा अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली असता अपुरी विद्युत व्यवस्था असलेचे दिसून येत आहे. सदर ठिकाणी एक हायमास्ट पोल उभा केल्यास येथील नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे.

या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून अंदाजे रु. 1 लक्ष 11 हजार इतका खर्च अपेक्षित आहे. तरी विटा नगरपरिषद हद्दीतील अहिल्यादेवीनगर येथील रस्ता क्र.4 येथे हायमास्ट पोल उभा करणेस मंजूरी देत आहे. याकामी आवश्यक ती पुढील नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 16/04/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 08

विषय – विटा नगरपरिषदेकडील मिळकत विभागास GeM पोर्टलवरुन एक प्रिंटर खरेदी करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी संगणक अभियंता यांची दिनांक 01/04/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील मिळकत विभागास प्रिंटर नसल्याने सदर विभागास दैंनदिन कामकाज करणेस अडथळा येत आहे. सदर विभागाकडे अतिरिक्त भांडार विभागाचा देखील कार्यभार असल्याने दोन्ही विभागाची प्रिंटींग कामे करणेस समस्या उद्भवत आहेत. तरी सदर विभागास एक प्रिंटर दिल्यास त्यांचे दैनदिन कामकाज करणे सोईचे होईल. याकामी कामी अंदाजे 25 हजार पर्यंत खर्च अपेक्षित आहे. तरी विटा नगरपरिषदेकडील मिळकत विभागास GeM पोर्टलवरुन एक प्रिंटर खरेदी करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 16/04/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.09

विषय – विटा नगरपरिषदेकडील विटा बसस्थानक परिसरामध्ये असणारे स्मार्ट युरिनल शिफ्टींग करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 16/04/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेने विटा बसस्थानक परिसरामध्ये स्मार्ट युरिनल बसविणेत आलेले आहे. सध्या विटा बसस्थानकाचे नुतणीकरणाचे काम सुरू आहे. आगार व्यवस्थापक यांनी बसस्थानक परिसरामध्ये असणारे स्मार्ट युरिनल काढून घेणेकामी नगरपरिषदेकडे अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचे स्मार्ट युरिनल शिफ्टींग करणे आवश्यक आहे.

तरी विटा नगरपरिषदेकडील विटा बसस्थानक परिसरामध्ये असणारे स्मार्ट युरिनल गोकुळ खानावळ जवळील सार्वजनिक शौचालयाच्या बाजूला शिफ्टींग करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 16/04/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.10

विषय – विटा नगरपरिषद मालकीच्या घोगांव जॅकवेल मधील गाळ काढणेकामी दाखल निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 16/04/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद मालकीच्या घोगांव जॅकवेल मधील गाळ काढणेकामी खालील निविदा दाखल आहेत

| | |
|---|---|
| 1) गजानन रामचंद्र निकम | अंदाजपत्रकीय दराने |
| 2) कुलदिप कुंडलिक भिंगारदेवे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जादा दराने |
| 3) सुहेल सलीम तांबोळी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8% जादा दराने |

उपरोक्त निविदापैकी गजानन रामचंद्र निकम यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा